भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ८०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/१२/२०१६

**१) दोन अनोळखी इसमांनी अल्पवयीन मुलीला पळवुन नेण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/१२/२०१६ रोजी १०.३० वा. दर. यातील फिर्यादी ची अल्पवयीन मुलगाी ही नेहमी प्रमाने शाळेत जात असतांना यातील २ अनोळखी इसमांनी आपले चेह–यावर रूमाल बांधुन संगनमत करून त्याचे ताब्यातील मोटार सायकलने फिर्यादीचे मुलीस रोडवर थांबवुन तीला तुझ्या बहीनीचे साक्षगंध कसे झाले तु आमच्या सोबत चल असे म्हणुन मोटार सायकलवर मागे बसलेल्या इसमाने मुलीचा हात पकडुन ओढुन पळवुन नेण्याचा प्रयत्न केल्याने सदरची माहीती मुलीने फिर्यादीस मोबाईलवर दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३६३,५११,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा बागडे पोस्टे साकोली हे करीत आहेत.

**२) एसीबी भंडारा यांची कारवाई. :–**

दिनांक ०८/१२/२०१६ रोजी १२.४० वा. दर. यातील अरोपी क्र. १ याने आपले पदाचा स्वत:चे आर्थीक लाभाकरीता वाम व भ्रष्ट मार्गाचा वापर करून तक्रारदार प्रकाश बालकदास नागदेवे यांना त्याचे ०.५ एकर जागेच्या सातबारा वरील तक्रादाराच्या आईचा मृत्यु झाल्याने मृत आईचे नाव सातबारा वरून कमी करून देण्यासाठी ५००/–रू लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३००/–रू यातील आरोपी क्र. २ यांचे मार्फतीने स्विकारल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ७,१२,१३,(१) (ड),१३ (२) ला.प्र.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पुल्लरवार एसीबी भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अवैध दारु /जुगार-अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०८/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. कारधा, तुमसर, व लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ लिटर हातभट्टी दारू कि. ४,०००/–रू. व तसेच जुगारातुन कि. २२५/–रू असा एकुण कि. ४२२५/ –रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गांडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.